**विषय :-** राज्यातील सर्व जिल्ह्यातील पोलिस अधिकारी / कर्मचारी खाजगी वाहनांवर "पोलिस बोध चिन्ह तसेच पोलिस" लिहणाऱ्या वाहनांवर कारवाई करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व)**

बी-२, ३ रा मजला, वडाळा ट्रक टर्मिनल, वडाळा, मुंबई (पूर्व) ४०० ०३७.

**दूरध्वनीक्र. २४०३६२२१ फॅक्सनं. २४०३६२६१**E-mail:rto.03-mh@gov.in

---

कार्यालयीन आदेश क्र./प्रापका/खटला/मुं(पूर्व)/२०२४/जाक्र. 6429 दि. 6 AUG 2024

**संदर्भ :-** श्री. विकी कुंडलिक जाधव, पत्रकार यांचा या कार्यालयास दि.१६/०७/२०२४ रोजीचा ई-मेल.

**कार्यालयीन आदेश**

उपरोक्त संदर्भांकित विषयानुसार, श्री. विकी कुंडलिक जाधव, पत्रकार यांनी राज्यातील सर्व जिल्ह्यातील पोलिस अधिकारी / कर्मचारी खाजगी वाहनांवर "पोलिस बोध चिन्ह तसेच पोलिस" लिहणाऱ्या वाहनांवर कारवाई करणेबाबत तक्रारीचा ई-मेल प्राप्त आहे.

सबब, या कार्यालयातील सर्व कार्यरत वायुवेग पथकांमधील मधील मोटार वाहन निरीक्षक / सहा. मोटार वाहन निरीक्षक यांना एतद्वारे आदेशित करण्यात येते की, आपल्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात **तपासणी दरम्यान खाजगी वाहनांवर** "पोलिस बोध चिन्ह तसेच पोलिस" लिहणाऱ्या वाहनांना तसेच वाहनांत 'महाराष्ट्र शासन' अशी पाटी किंवा बोध चिन्हांचा वापर वाहनमालक त्यांच्या वाहनांवर करीत असल्याचे वाहन तपासणीमध्ये निदर्शनास आल्यास दोषी वाहनांवर मोटार वाहन अधिनियम, १९८८ व तद्नुषंगीक नियमांतील तरतूदीनुसार काटेकोरपणे कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल खटला विभागात न चुकता सादर करण्यात यावा.

**सोबत :-** वरील प्रमाणे

06/08

(स.आ.गिरी)
सहा.प्रादेशिक परिवहन अधिकारी
प्रादेशिक परिवहन कार्यालय,
मुंबई (पूर्व)

प्रत -

१) कार्यालयातील सर्व कार्यरत वायूवेग पथकांतील मोटार वाहन निरीक्षक / सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक यांना कार्यवाहीस्तव.

२) कार्यालयीन नस्ती व आदेश नोंदवही

CamScanner

दूरध्वनी क्र. (०२२)२४९५४४४३
(०२२)२४९२०३५८
[illegible] क्र. १०२
mail-cp.mumbai.jtcp.traf@mahapolice.gov.in

पोलीस सह आयुक्त (वाहतूक),
मुंबई यांचे कार्यालय,
वाहतूक पोलीस मुख्यालय,
८७, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई ४०० ०३०

जा. क्र. २५ /पोसआ/वाहतूक/कां/२०२२ दिनांक :- २५/०३/२०२२

## कार्यालयीन आदेश

बहुतेक पोलीस अधिकारी व अंमलदार आणि त्यांचे नातेवाईक हे त्यांच्या खाजगी वाहनावर 'पोलीस' अशी लाल रंगाची पाटी लावून त्यांचे वाहन चालवितात अशाप्रकारच्या तक्रारी प्राप्त होत असतात. अशा प्रकारे 'पोलीस' पाटी लावून खाजगी वाहन चालवित असल्याबाबत मा. उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त करून संबंधितांवर कारवाई करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

सर्व नागरीकांना समान कायदा या तत्वानुसार पोलीसांनीच कायद्याचे उल्लंघन करणे हे पोलीसांची प्रतिमा मलीन करण्यासारखे आहे. अशा प्रकारे 'पोलीस' पाटी लावलेली वाहने नाकाबंदी तसेच सुरक्षा तपासणी न होता सोडली जाण्याची शक्यता असते. त्यामुळे पोलीस पाटीचा गैरउपयोग होऊन नागरिकांच्या जीवाला धोका होवू शकतो. तसेच 'पोलीस' पाटी लावून अशाप्रकारच्या वाहनांमार्फत घातपात कृत्य होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी सर्व प्रभारी पोलीस निरीक्षक यांनी त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी व अंमलदार यांना त्यांच्या खाजगी वाहनावर 'पोलीस' पाटी किंवा पोलीसांचे चिन्ह असलेले स्टिकर्स काढून टाकण्याबाबत अवगत करावे. यापुढे अशाप्रकारची पोलीस पाटी किंवा पोलीसांचे चिन्ह असलेले स्टिकर्स लावल्याचे आढळून आल्यास संबंधित पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर कार्यालयीन आदेश सलग ४ दिवस दोन्ही सत्रातील परेडवर वाचून त्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना अवगत करावे.

( राजवर्धन )
पोलीस सह आयुक्त,
वाहतूक, मुंबई.

**प्रत माहिती करिता:-**
१) अपर पोलीस आयुक्त, वाहतूक, मुंबई.
२ ) पोलीस उप आयुक्त, दक्षिण, मुख्यालय व मध्य, पुर्व उपनगरे, पश्चिम उपनगरे, वाहतूक, मुंबई.
३) सहाय्यक पोलीस आयुक्त, सर्व परिक्षेत्रीय, वाहतूक, मुंबई.

**प्रत कार्यवाहीकरिता:-**
वरिष्ठ/प्रभारी पोलीस निरीक्षक, सर्व वाहतूक विभाग/ वाहतूक शाखा, मुंबई.

CamScanner

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

परिपत्रक क्रमांक: [illegible]
दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ७ सप्टेंबर, २०१५.

-: परिपत्रक :-

पोलीस अधिकारी / कर्मचारी हे त्यांच्या मालकीच्या / खाजगी वाहनांवर पोलीस चिन्ह अथवा नेमप्लेट लावतात अशा प्रकारच्या तक्रारी शासनस्तरावर प्राप्त झाल्या आहेत. ही कृती बेकायदेशीर असुन पोलीस अधिकारी /कर्मचारी यांना त्यांच्या मालकीच्या खाजगी (दुचाकी/चारचाकी) वाहनांवर 'पोलीस विभागाचे चिन्ह' अथवा 'पोलीस' अशी पाटी लावू नये अशा सक्त सूचना देण्यात याव्यात. तसेच सदर सुचनाचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल याची दक्षता घ्यावी. प्रस्तुत सुचनांचे उल्लंघन केल्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशांनुसार व नावाने.

विजय सावळे
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे.
३. पोलीस महानिरिक्षक ( सर्व परिक्षेत्र).
४. सर्व पोलीस आयुक्त.
५. सर्व पोलीस अधिक्षक.

प्रत :- निवडनस्ती पोल-१२.

CamScanner

जावक क्रमांक : ७२५/२०२४
कळंबोली वाहतुक शाखा, नवी मुंबई
दिनांक : ०१/०७/२०२४

प्रति,

श्री. विकी कुंडलीक जाधव,
पत्रकार (ठाणे जिल्हाप्रमुख राज्य दैनिक बाळकडू वृत्तसेवा)
मो.नं.९९७५८२८००३ vickyjadhav.1117@gmail.com

विषय : राज्यातील सर्व जिल्यातील पोलीस अधिकारी/कर्मचारी खाजगी वाहनांवर "पोलीस बोध चिन्ह तसेच पोलीस" लिहणा–या वाहनांवर कारवाईसाठी आदेश देणेबाबत.

संदर्भ:– आपण दिनांक ०५.०६.२०२४ रोजी केलेल्या ई मेल अर्जाबावत.

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भान्वये कळविण्यात येते की, राज्यातील सर्व जिल्यातील पोलीस अधिकारी/कर्मचारी खाजगी वाहनांवर " पोलीस बोध चिन्ह तसेच पोलीस" लिहणा–या वाहनांवर कारवाईसाठी आदेश पोलीस बोध चिन्ह तसेच पोलीस" लिहणा–या वाहनांवर कारवाईसाठी आदेश देणेबाबत तसेच इतर आशय नमुद करून वरिष्ठ कार्यालयात आपण केलेला ई मेल अर्ज पुढील कारवाईकामी या कार्यालयात प्राप्त झाला.

सदर ई मेलचे अनुषंगाने कळंबोली वाहतूक शाखेकडील कार्यरत असलेल्या सर्व अधिकारी व अंमलदार यांना त्यांचे खाजगी वाहनांवर पोलीस बोध चिन्ह अथवा पोलीस या नावाचा वापर करू नये याबावत हजेरीवर सक्त सुचना देण्यात आलेल्या असून असे चिन्ह असल्यास तात्काळ काढून टाकणेबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच यानंतरही कोणाचे वाहनांवर असे चिन्ह दिसल्यास त्यांचेवर मोटार वाहन कायदयान्वये कारवाई करून त्यांचा कसुरी अहवाल वरिष्ठांना सादर करण्यात येईल असे देखील सांगण्यात आलेले आहे.

सदर ई मेल प्राप्त झालेनंतर कळंबोली वाहतूक शाखेच्या हददीत पोलीस/प्रेस/महाराष्ट्र शासन व इतर नावे लिहलेल्या सर्व प्रकारचे वाहनांवर दिनांक २१.०६.२०२४ ते २७.०६.२०२४ रोजीपर्यंत विशेष मोहिम राबवून एकुण ४४ कारवाई करण्यात आलेली आहे. सदरची कारवाई तसेच सदरची कारवाई निरंतरपणे सुरू ठेवणेबाबत सर्व अधिकारी व अंमलदार यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.

तरी आपण केलेल्या अर्ज प्रकरणी कार्यवाही करण्यात आलेली असून अर्ज दप्तरी दाखल होणेबाबत वरिष्ठ कार्यालयात अहवाल सादर करण्यात येत आहे.

(हरीभाउ बानकर)
पोलीस निरीक्षक
कळंबोली वाहतूक शाखा, नवी मुंबई.

CS CamScanner

# परिवहन आयुक्त यांचे कार्यालय

५ वा मजला, फाऊंटन टेलिकॉम भवन-२, महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१

दुरध्वनी क्रमांक ०२२-२२६१४७२६

Email – dycomm.enf1@gmail.com


क्रमांक - एमव्हीआर-०९०१/सीआर-७९/का.२(५)/२०२२/जा.क्र. 7653 दिनांक :- 05 JUL 2022

प्रति,
सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी,
सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी.

विषय :- मोटार वाहनांवर महाराष्ट्र शासन अथवा इतर बोध चिन्हांचा वापरास आळा घालणे.

उपरोक्त विषयास अनुसरुन खाजगी वाहनांवर किंवा वाहनांत महाराष्ट्र शासन अशा पाटी किंवा बोध चिन्हाचा वापर होत असल्याबाबत या कार्यालयास निवेदने प्राप्त होत आहेत.

सबब आपणास कळविण्यात येते की, खाजगी वाहनांवर किंवा वाहनांत महाराष्ट्र शासन अशा पाटी किंवा बोध चिन्हे वाहनमालक त्यांच्या वाहनांवर वापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यावर मोटार वाहन अधिनियम व त्याअंतर्गत नियमानुसार कारवाई करावी. तशा सूचना आपल्या अधिनस्त वायुवेग पथकांना देण्यात याव्यात.

(जितेंद्र पाटील)
परिवहन उप आयुक्त (अं-१),
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

CamScanner